**पाटबंधारे प्रकल्पांच्या कामांची प्राकलने/सुधारित प्रशासकीय मान्यतेची प्राक्कलने तयार करताना विचारात घ्यावयाच्या बाबी**

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २००९/(४६५/२००९)मोप्र-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ जानेवारी २०१०

वाचा:- संदर्भ-१ शासन निर्णय क्र. संकीर्ण २००१/२१/(५१६/२००१)लपा-२, दि.१८/९/२००१
२.शासन निर्णय क्र. संकीर्ण २००१/२१/(५१६/२००१)लपा-२, दि.१२/२/२००२

सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्राक्कलनाबाबत शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, बहुतांशी कामे मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीत पूर्ण न होता प्रत्यक्ष काम पूर्ण होताना त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते.

सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावांमध्ये खालील कारणांमुळे वाढ झालेली आढळून येते.

१. प्रकल्प बांधकामाचा मूळ नियोजनाचा कालावधी व प्रत्यक्ष कालावधी मधील फरकामुळे भाववाढ

२. धरणाचा पाया मूळ अंदाजपत्रकापेक्षा अधिक खोलीवर लागणे

३. मातीच्या धरणांचे काटछेद मूळ संकल्पन केल्यापेक्षा अधिक होणे

४. दगडी धरणाच्या संकल्पनातील बदल

५. कामाचे अंदाजपत्रकीय दर काढताना जी वहन अंतरे आधारभूत धरण्यात आली आहेत, त्या ठिकाणी साहित्यसामुग्री उपलब्ध नसल्याने जादा वहन अंतरावरुन ही साहित्यसामुग्री आणावी लागणे.

६. अपूऱ्या सर्वेक्षण व अन्वेषणावर आधारीत प्रकल्प अहवाल तयार करुन काम सुरु करणे.

७. मातीच्या धरणांच्या बाबतीत जलरोधक खंदकाची (C.O.T.) खोली अधिक करण्याची आवश्यकता निर्माण होणे.

८. सांडव्याच्या विविध घटकांच्या संकल्पनेमध्ये बदल, alignment मध्ये बदल, EDA साठी आवश्यकता

९. मूळ प्रस्तावात संपूर्णतः विचार न केल्याने अधिक बाबींची उदा.की -वॉल (Key-wall), रिटेनिंग वॉल (Retaining-wall), प्रोटेक्शन वॉल (Protection-wall) ची तरतूद करणे

१०. हायटेंशन लाईन किंवा ट्रान्समिशन लाईन जर धरण किंवा बुडीत क्षेत्रातून जात असल्यास त्या हालवण्याबाबतची मूळ प्रस्तावात तरतूद न करणे अथवा पुरेशी तरतूद न करणे

११. मऊ स्तर आणि कठीण भूस्तर यांच्याबाबतील झालेल्या चुकीच्या वर्गीकरणामुळे परिमाणात वाढ

१२. प्रकल्प अहवाल वा तांत्रीक मंजुरी देताना आवश्यक खोलरजमा न करता Controlled blasting साठी तरतूद असणे.

१३. बुडीत क्षेत्रात जाणारे रस्ते व पोचरस्ते यांचा समावेश मूळ प्रस्तावात न करणे अथवा पुरेशी तरतूद न करणे

१४. धरणाच्या नियंत्रक पातळ्यामधील बदलांमुळे धरणाच्या पाणीसाठ्यात बदल व त्यामुळे करावे लागणारे अभियांत्रिकी फेरबदल यामुळे सुधारित प्रस्तावात होणारी वाढ

१५.प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्र परिगणनेतील चुकीमुळे/बदलामुळे प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रात व सिंचनाच्या तीव्रतेत होणारे बदल यामुळे प्रकल्पाच्या खर्चात होणारा बदल

१६. मूळ प्राक्कलनात कालवा अस्तरीकरणाची तरतूद नसताना सुधारित प्रस्तावात अशा प्रकारची तरतूद करणे

१७. सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्राक्कलन तयार करताना पूर निर्दिष्ट प्रमाणे संकल्प चित्रातील व्याप्तीतील व अभियांत्रिकी फेरबदल इत्यादी एकाच वेळी समग्र विचार करुन न करता वेळोवेळी व वारंवार करणे यामुळे वारंवार सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी लागणे

१८. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील सूचनांचे पालन न करता नियमबाह्य तरतूदी करणे उदा. संधानकाच्या ऐवजी वगडी बांधकाम प्रथमत: प्रस्तावित करणे व नंतर सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या वेळी संधानक प्रस्तावित करुन अंदाजपत्रकात वाढ करणे.

१९. वनजमिन, भूसंपादन व पुनर्वसन

उपरोक्त बाबी टाळण्याकरीता खालील निर्देश देण्यात येत आहेत.

<u>(I) अन्वेषणाबाबत:-</u>

१. अंदाजपत्रक करताना भूस्तर व पायाचे तलांकांचे सखोल अन्वेषण केल्याशिवाय मूळ प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करु नये. व अशा अपुऱ्या अन्वेषणामुळे त्रुटी निर्माण झाल्यास संबंधित अन्वेषण करणारे शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता जबाबदार राहतील.

मंजूर अंदाज पत्रकापेक्षा वेगळा भूस्तर वेगळ्या तलांकास लागल्यास किंवा बांधकामाचा पाया मंजूर तलांकापेक्षा अधिक खोल गेल्यास त्यामुळे होणाऱ्या आधिक्यास सक्षम स्तरावर (अधिक्षक अभियंता/ मुख्य अभियंता) लेखी मान्यता मिळाल्याशिवाय शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी काम करु नये व असे केल्यास बांधकाम करणारे संबंधित शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता जबाबदार राहतील. याची खातरजमा संबंधीत अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांनी क्षेत्रीय भेटीच्या वेळी करावी.

२. पाणलोट क्षेत्र परिगणनेतील चुकीमुळे / बदलामुळे सुधारित प्रस्तावात पाणी उपलब्धता, सिंचन क्षेत्रात व सिंचन तीव्रतेत बदल होवून प्रकल्पाच्या खर्चात बदल झाल्यास संबंधित अन्वेषण करणारे शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता जबाबदार राहतील.

३. भूसंपादनाची तरतूद करताना (अ) जमिनीच्या तालुक्यामधील अधिकृत दरा व्यतिरिक्त दर देणे (ब) जमिन संपादन क्षेत्र अचूक न काढणे (क) बुडीत क्षेत्रातील पुनःस्थापनेच्या बाबी वगळणे अथवा अपुऱ्या तरतूदी (पोच रस्ता, घरे, गोठे, विद्युत लाईन्स इत्यादी) यामुळे वाढीव खर्चाचे सुधारित प्रस्ताव तयार करावे लागल्यास संबंधित अन्वेषण करणारे शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता जबाबदार राहतील. अशी बाब आढळल्यास बांधकामाशी संबंधीत कार्यकारी अभियंताने वरीष्ठ अधिकाऱ्याच्या तात्काळ निदर्शनास आणावे.

४. मंजूर अंदाजपत्रकातील वहन अंतरात वाढ झाल्यास किंवा अंदाजपत्रकातील कामासाठी आवश्यक बांधकाम साहित्यासाठी मान्यता प्राप्त अंतराचे आत न मिळाल्याने होणाऱ्या वाढीव वहन अंतराची पडताळणी करुन प्रमाणपत्र देणारी / अन्वेषण अधिकारी शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता जबाबदार राहतील. अपवादात्मक परिस्थितीत वहन अंतरात वाढ अधिक्यास सक्षम स्तरावर मान्यता देताना समर्थनीय कारणे नोंद करुन करुन त्यावर निर्णय घ्यावा.

साहित्यसामुग्री/पाणी यांच्या उपलब्धतेच्या ठिकाणापासून कामाच्या क्षेत्रिय स्थळापर्यंत असलेले अंतर याची निश्चिती अंतर मोजून करण्यात यावी. त्याची शहानिशा कार्यकारी अभियंतानी स्वतः करावी व तसे प्रमाणपत्र अंदाजपत्रकासोबत जोडण्यात यावे. कोणत्याही कारणासाठी/बाबीसाठी वहन अंतर कार्यकारी अभियंता स्तरावर एक कि.मी. पर्यंत, अधीक्षक अभियंता स्तरावर दोन कि.मी. पर्यंत व त्याच्यापेक्षा जास्त अंतर असल्यास मुख्य अभियंता स्तरावर पूर्वमान्यता घेतलेली असणे जरुरीचे आहे.

**(II) संकल्पचित्रातील बदलाबाबत**

संकल्पचित्रातील बदल करुन सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला असेल तर मूळ संकल्पचित्रापेक्षा जे बदल करण्यात आले आहेत, त्याबाबत सक्षम स्तरावर (महामंडळ / शासन ज्यांनी मूळ प्रमा दिली आहे.) यांची सदर बदलास तत्वत: मान्यता घेवून सदर सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.तसेच अशी कार्यपध्दती न अवलंबिता प्रत्यक्षात संकल्पचित्रात बदल करुन काम केल्यास त्यास प्रत्यक्ष बांधकाम करणारे संबंधित शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता जबाबदार राहतील. धरणाच्या बाबतील संकल्पनेतील बदल प्रथम सुधारील प्रशासकीय मान्यतेपर्यंत ग्राह्य होउ शकतात. द्वितीय व पुढील सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावात असे कारण समर्थनीय निश्चितच नाही. सर्व कालव्यावरील CD works बाबतही ही बाब लागू होईल.

**(III) व्याप्तीतील बदलाबाबत** (धरण साठयातील बदल अथवा लाभक्षेत्रातील सिंचनक्षेत्रात बदल):-

मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त योजनेच्या व्याप्तीत बदल करुन सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करीत असल्यास सदर व्याप्तीतील बदलास ज्यांनी मूळ प्रशासकीय मान्यता दिली आहे. (महामंडळ/शासन) यांची तत्वत: पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहिल व सदर मान्यता सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक राहिल. अशा प्रकारची कार्यपध्दती न अवलंबिता काम करण्यात आल्यास त्यास प्रत्यक्ष बांधकाम करणारे कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता जबाबदार राहतील.

**(IV) इतर बाबी :-**

१. सक्षम अधिकाऱ्याच्या लेखी मान्यतेशिवाय मंजूर वहन अंतरापेक्षा जादा अंतरावरुन साहित्य आणून काम करुन घेवू नये व असे केल्यास संबंधित बांधकाम करणारे क्षेत्रीय शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता हे जबाबदार राहतील.

उ.

कठीण खडकात खोदकाम करताना काही ठिकाणी controlled blasting करावे लागते. तांत्रिक मंजूरी देतांनाच याची खातरजमा अधीक्षक अभियंता/ मुख्य अभियंता यांनी करावी. निविदा निश्चितीनंतर controlled blasting वाढवून देण्यापूर्वी महामंडळाची पूर्व मंजुरी घ्यावी. यासाठी चुकीचे अंदाजपत्रक करणाऱ्या शाखा अभियंता/उप अभियंता व कार्यकारी अभियंतावर जबाबदारी निश्चित करावी.

२. मंजूर अंदाजपत्रकातील बाबनिहाय परिमाणापेक्षा जादा परिमाणास अधीक्षक अभियंता / मुख्य अभियंता यांची योग्य पूर्व मान्यता घेतल्याशिवाय कार्यकारी अभियंता यांनी हे काम करु नये. अशी मान्यता देतांना अधीक्षक अभियंता/ मुख्य अभियंता यांनी वाढीव परिमाणाबाबत स्थळ खातरजमा करुन व लेखी कारणे नमूद करुन मान्यता द्यावी. अन्यथा असे काम केल्यास संबंधित बांधकाम करणारे कार्यकारी अभियंता हे जबाबदार राहतील.

३. मंजूर प्रकल्प अहवालात अंतर्भूतीकरणाची तरतूद नसताना ते काम करण्याचे ठरले असे काम हाती घेणे आवश्यक असल्यास त्याची तांत्रिक व आर्थिक कारणे नोंदवून मंजूर प्रकल्प अहवाल व मूळ प्रशासकीय मान्यता ज्या स्तरावर देण्यात आली आहे त्यांची पूर्वमान्यता घेऊनच ते काम हाती घ्यावे. अन्यथा सदर बांधकाम करणारे कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता जबाबदार राहतील. सुधारित प्रशासकीय मान्यता सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी मूळ प्रशासकीय मान्यतेतील उणिवा सक्षम स्तरावर (महामंडळ /शासन ) निदर्शनास आणून त्यांची मान्यता घेऊन बांधकाम सुरु केल्यास अशा सुधारित प्रशासकीय मान्यता सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी राहणार नाही. अशी कार्यवाही करताना जे बदल होत असतील त्याबाबत मूळ प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नजरेस असे बदल आणून त्यांचे मत / अभिप्राय घेणे बंधनकारक राहिल. त्यानंतर सक्षम अधिकाऱ्याने याबाबत कोण जबाबदार आहे व त्यांचेविरुध्द काय कार्यवाही प्रस्तावित केली आहे, हे स्पष्ट करुनच सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण २००१/२१/(५१६/२००१)लपा-२, दि. १८/९/२००१ व शासन निर्णय क्र. संकीर्ण २००१/२१/(५१६/२००१)लपा-२, दि. १२/२/०२ चे शासन निर्णय मोठे व मध्यम प्रकल्पासही या परिपत्रकान्वये यापुढे लागू करण्यात येत आहेत व याची अमलबजावणी होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

सदर परिपत्रकाची अमलबजावणी होण्याकरीता वेळोवेळी / प्रकल्पाच्या क्षेत्रीय भेटीवेळी अधीक्षक व मुख्य अभियंता यांनी आढावा घ्यावा. अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता कार्यालयाकडून वेळोवेळी कनिष्ट कार्यालयाची तपासणी करण्याची तरतूद आहे. या तपासणीच्या वेळी शासनाने पूर्वी वेळोवेळी निर्देशीत केल्याप्रमाणे तसेच या परिपत्रकातील तरतुदींची अमलबजावणी होईल याची खातरजमा करावी. सदर परिपत्रकाची अमलबजावणी होण्यासाठी कार्यकारी संचालक यांनी प्रशासकीय मान्यता/ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करताना सोबतच्या तपासणी सूची प्रमाणे प्रस्ताव योग्य आहे, याची खात्री करुन व तसे प्रमाणित करुनच प्रस्ताव शासनास सादर करावेत. तसेच महामंडळ स्तरावर देखील जे प्रस्ताव मंजूर करण्यास महामंडळ सक्षम आहे, असे प्रस्ताव मंजूर करताना उपरोक्त निर्देशांची खात्री करुनच महामंडळ स्तरावर कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१००११५२०२०५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सी. थों. भिडे)
मुख्य अभियंता (ज व प्र) व सह सचिव

प्रति,

मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
यांना सुचित करण्यात येते की वरील परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यकारी अभियंता/ उप अभियंता/ शाखा अभियंता यांच्या निदर्शनास आणावे.
आंतर वित्त सल्लागार व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व तांत्रिक अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यासन मोप्र-२ संग्रहार्थ / निवडनस्ती